**कृपया प्रसिध्दीसाठी -** **17 जून 2010**

**सीएनजी - पीएनजीची दरवाढ ही**
**पेट्रोल - डिझेल दरवाढीची नांदीच - राम नाईक**

**मुंबई, गुरुवार :** " सीएनजी व पीएनजीच्या ही आगामी काळात किमतीत झालेली 30 टक्के दरवाढ पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीची नांदीच आहे. भाववाढीच्या दुष्टचक्राची गती या भाववाढीमुळे आणखीच वाढेल. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने देशातील जनतेच्या विरोधात जणू युद्ध पुकारले आहे.", अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज मुंबईत प्रसिध्द केलेल्या पत्रकात दिली आहे.

श्री. राम नाईक पुढे म्हणाले, "संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने गेल्या सहा वर्षात पेट्रोलियम पदार्थांच्या किमतीसाठी तीन समित्या बनविल्या. पहिल्या समितीचे अध्यक्ष होते रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर, दुसरीचे अध्यक्ष होते माजी मंत्रीमंडळ सचिव, तर श्री. किरीट पारेख तिस-या समितीचे अध्यक्ष होते. त्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतरही सरकारने अद्याप पेट्रोलियम पदार्थांच्या किमती संबंधीचे धोरण ठरविलेले नाही. धोरण न ठरवता केलेल्या या भाववाढीमुळे 'आम आदमी' आणखीच भरडला जाईल. झालेले सर्व निर्णय तात्पुरत्या स्वरुपाचे (ॲडहॉक) आहेत".

"सीएनजी व पीएनजी पाठोपाठ पेट्रोल आणि डिझेल यांच्या किंमती वाढायला नको असतील तर जनतेने आता जागे होऊन लढा सुरु केला पाहिजे. तसेच तो लढा किंमतवाढ मागे घेतल्यानंतरच थांबविला पाहिजे", असेही श्री. नाईक यांनी पत्रकाच्या शेवटी म्हटले आहे.

**(कार्यालय सचिव)**